वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय अधिपत्याखालील संस्थेतील गट क व ड ची पदे बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेला एजन्सीला मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -०६२४/प्र.क्र.२८६/प्रशा-२**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ०४ ऑक्टोबर २०२४

वाचा -

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:- विअप्र-२०१३/प्र.क्र.१३/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
२) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांकः भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
३) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन अधिसूचना दिनांक २४.०७.२०१९.
४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय पत्र क्र. DMER/२०२४-O/O COMMISSIONER/१०७७४, दिनांक २५.०६.२०२४.
५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -०६२४/प्र.क्र.२८६/प्रशा-२, दिनांक १२.०७.२०२३
६) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांचे पत्र क्र. संवैशिवसं/यंसाख/निविदा स्वीकृती/१४०७८/२०२४, दिनांक २६.०९.२०२४

प्रस्तावना -

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालयांतील गट क व ड ची बाह्यस्रोत पदे भरण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नुषंगाने संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयान्वये ई -निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार संचालनालय स्तरावर प्रसिध्द केलेल्या ई -निविदाअंती १)मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि., २) मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लि. ३) मे. बीवीजी इंडिया लि. हे ३ निविदाधारक पात्र ठरले आहेत. सदर पात्र निविदाधारकांपैकी मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. या सेवापुरवठादाराने न्युनतम सेवाशुल्क (१९.५ टक्के) दर सादर केले आहेत. त्यानुसार, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय अधिपत्याखालील संस्थेतील गट क व ड ची पदे बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेला एजन्सीला मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय तसेच शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व रुग्णालयांतील गट क व ड ची बाह्यस्त्रोत पदे बाह्ययंत्रणेद्वारे पुरवठा करण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी दिनांक २६.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे निविदाअंती पात्र निविदाधारकांना खालील प्रमाणे मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. सेवा पुरवठादाराने सादर केलेल्या न्युनतम सेवाशुल्क दर (१९.५ टक्के) प्रमाणे पुरवठा आदेश विभागून देण्यास व त्याकरीता येणा-या अंदाजित वार्षिक खर्च रु. १९३,६०,३९,०९८/- (रुपये एकशे त्र्यान्नव कोटी साठ लाख एकोणचाळीस हजार अठ्यान्नव फक्त) (एजन्सीचे सेवाशुल्क ब जी.एस.टी करासह) ला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| **निविदाकारांचे नाव** | **मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. (L१)** | **मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लि. (L२)** | **मे. बीवीजी इंडिया लि. (L३)** |
|---|---|---|---|
| **कार्यालयाचे ठिकाण** | १) अकोला<br>२) अलिबाग<br>३) मुंबई<br>४) बारामती<br>५) छत्रपती संभाजीनगर<br>६) चंद्रपुर<br>७) धाराशिव<br>८) धुळे<br>९) गोंदिया<br>१०) हिंगोली<br>११) जळगाव<br>१२) कोल्हापुर<br>१३) लातुर<br>१४) मिरज<br>१५) नांदेड<br>१६) नंदुरबार<br>१७) परभणी<br>१८) सातारा<br>१९) सिंधुदुर्ग<br>२०) ठाणे | १) अमरावती<br>२) भंडारा<br>३) नागपूर<br>४) पालघर<br>५) पुणे<br>६) वर्धा<br>७) वाशिम | १) बुलढाणा<br>२) गडचिरोली<br>३) जालना<br>४) रत्नागिरी<br>५) सावनेर<br>६) सोलापुर |

उक्त विवरणपत्रात नमूद कार्यालयाच्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालय/रुग्णालय/आरोग्य पथक इत्यादी ज्या संस्था कार्यरत आहेत त्या रुग्णालयांमध्ये मंजुर गट क व ड कंत्राटी पदे संबंधित सेवापुरवठादारमार्फत उपलब्ध करुन घेण्यात यावेत.

**अटी व शर्ती -:**

१) वित्त विभागाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनेनुसार बाह्यस्त्रोताने सेवा उपलब्ध करुन घेतांना नियमितपणे पदे भरल्यावर शासनास जितका खर्च झाला असता त्या खर्चाच्या कमीत कमी २० ते ३० टक्के इतकी बचत होणे आवश्यक आहे. सदर सूचनेचे पालन केले जाईल याची खातरजमा करावी. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी सेवा पुरवठादारांशी करारनामा निविदेमधील अटी शर्ती (RFP Clause ३.३.) प्रमाणे करण्यात यावा.

२) संचालनालय स्तरावरुन बाह्यस्त्रोतामार्फत Mechanized Cleaning Services ची सेवा उपलब्ध झाल्यानंतर ज्या संस्थांनी सदर सेवापुरवठादारांकडून सफाईगाराचे काल्पनिक/कंत्राटी पदे उपलब्ध करुन घेतले असल्यास त्यांच्या सेवा संपुष्टात आणण्यात याव्यात.

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०७/२०२४ अन्वये नवीन शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व रुग्णालय निर्माण झाल्यास वाढीव काम वाटपाचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, आता पुरवठादार निश्चित झाले असल्याने वाढीव कामाकरीता एल १ पुरवठादाराला प्राथम्याने देण्यात यावे.

४) प्रस्तुत बाबीवर होणारा खर्च संबंधित संस्थांच्या "१० कंत्राटी सेवा" या उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पित वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. सेवापुरवठादाराने त्यांचे देकार संस्थांना सादर केल्यानंतर किमान ४५ दिवसांत त्यांचे देयके अदा करण्यात येतील, याची दक्षता संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता घेतील.

५) संचालनालय अधिनस्त ज्या संस्थेत बाह्यस्त्रोत सेवापुरवठादारामार्फत पुरविण्यात येत असलेल्या कंत्राटी पदांची कराराची मुदत संपली आहे अश्या सेवापुरवठादांची सेवा संपुष्टात आणावी व या शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या सेवापुरवठादारांकडून सदर पदे उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी करावी.

६) बाह्यस्त्रोताने सेवा उपलब्ध करुन देणा-या सेवापुरवठादाराने, शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन व भत्यांची तसेच वेळोवेळी लागू असलेल्या करांची अदायगी करणे

बंधनकारक राहील. सेवापुरवठादाराने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेले कायदेशीर दायित्व (Statutory liabilities) उदा. भविष्यनिर्वाह निधी, ग्रॅच्युइटी, ईएसआयसी, बोनस, लेबर वेलफेअर फंड, रजा रोखीकरण इ.चा समावेश वेतनात अंतर्भूत आहे असे कायदेशीर दायीत्व संबंधित प्राधिकरणाकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची राहील. त्याबाबतची कागदपत्रे आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांच्याकडे वेळोवेळी जमा करण्याची जबाबदारी सूचीबध्द सेवा पुरवठादार यांची राहील.

७) संचालनालय अधिनस्त शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी/परिचार्या महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये NIC ने विकसित केलेले NextGen e Hospital ही आरोग्य सेवा व्यवस्थापन प्रणाली (HMIS) कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक एकूण २८७ डाटा एन्ट्री ऑपरेटर पदे संबंधित पुरवठादारामार्फत भरण्यात यावेत. सदर बाबीकरीता होणारा खर्च एच.एम.आय.एस. प्रकल्पाचे लेखाशिर्ष ३० - इतर कंत्राटी सेवा (२२१० डी ९६२) मधून भागविण्यात यावा.

८) सेवापुरवठादाराने केलेल्या कामांचे वार्षिक मुल्यांकन आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी करावे.

२. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ७ येथे नमुद अटी व शर्तीची पुर्तता करण्याची व उक्त खरेदी प्रचलित नियमानुसार व आवश्यकतेप्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उपविभाग-४, अनुक्रमांक -११ अनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००४१२५४४०५८१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=0477d837dc0b00fc2cbd45d17d07c625c3417378f97d493a8a277faa29f65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE9523688A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2024.10.04 19:12:33 +05'30'

(म.गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच आयुष संचालनालय, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र ½, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
५. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
६. सर्व अधिष्ठाता/ अधिक्षक, शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व रुग्णालये.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. अवर सचिव / कक्ष अधिकारी (आयु-१/आयु-२), वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.निवडनस्ती (प्रशा-२)